ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

# नवीन शैक्षणिक धोरणाने सुचविलेल्या 'शाळा संकुल' योजनेचा अवलंब याबाबत शालेय शिक्षकांच्या मतांचा अभ्यास

** Dr. Rajashree Milind Joshi,*

** Assistant Professor, Seva Sadan's College of Education,Ulhasnagar-3*

**सारांश:**

*सर्व शिक्षा अभियान व समग्र शिक्षा उपक्रम यामुळे अनेक छोट्या शाळा प्रस्थापित झाल्या. भारतात १,०८,०१७ एक शिक्षकी शाळा आहेत. यातील ८५,७४३ शाळा पूर्व पर्थामिक आहेत. या छोट्या शाळांमध्ये शिक्षक नियुक्ती आणि भौतिक संसाधने पुरवठा हे एक आव्हान आहे. या परिस्थितीमुळे अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होतो, शिक्षण क्षेत्राचा दर्जाही खालावतो. या शाळा व्यवस्थापनासाठी आव्हान आहेत. असे मत नवीन शैक्षणिक धोरणात मांडले आहे. या परिस्थितीवर राज्यशासन व केंद्रशासित प्रदेश शासनाकडून २०२५ पर्यंत उपाय ठरवून त्याचा अवलंब करावा असे नवीन शैक्षणिक धोरणात सुचविले आहे. यासाठी शाळांचे एकत्रीकरण करून 'शाळा संकुल' योजना खालील दोन प्रकारे सुचविली आहे.*

- *दोन प्राथमिक शाळा व एक माध्यमिक शाळा यांचे संकुल*
- *काही शासकीय शाळा व काही खाजगी शाळा यांचे संकुल*

*संकुलातील शाळा भौतिक संसाधने, (क्रीडांगण इत्यादी) तसेच मनुष्यबळ ( शिक्षक, समुपदेशक), उपक्रम (प्रदर्शने इत्यादी) सामाईकरित्या वापरतील. या योजनेमुळे शालेय व्यवस्थापन व शिक्षक यांच्या पुढे अनेक आव्हाने उभी राहणार आहेत. सदर लेखात शालेय शिक्षकांचे या योजनेसंदर्भात मत जाणून घेऊन हि योजना यशस्वी व्हावी यासाठी काही सूचना देण्याचा प्रयत्न केला आहे.*

**मुख्य शब्द:**

*शाळा संकुल, भौतिक संसाधने, सामाजिक चेतना केंद्र*

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

**प्रस्तावना:**

देशातील मुले हि देशाची संपत्ती असते, कारण ते भावी नागरिक असतात. भावी नागरिक जर अद्ययावत शिक्षणाने समृद्ध असतील तर देशाचे भवितव्य उज्ज्वल समजले जाते. यासाठीच प्राथमिक शिक्षणाचे सर्वत्रीकरण करणे या मुख्य उद्देशाने २००० साली सर्व शिक्षा अभियान सुरु झाले. त्यावेळी शाळा उपलब्ध नसलेल्या अधिवासंमध्ये शाळा उभारल्या गेल्या.२००९ साली शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणी अंतर्गत प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी अद्ययावत पायाभूत सुविधा, आर्थिक निधी उपलब्ध करून देणे यावर लक्ष केंद्रित झाले. ४ ऑगस्ट २०२१ रोजी प्राथमिक, माध्यमिक शिक्षण व अंगणवाडी शिक्षिका प्रशिक्षण यामध्ये दुवा निर्माण करणारे समग्र शिक्षा अभियान राबविण्यास प्रारंभ झाला. समग्र शिक्षा अभियान २.० अंतर्गत २०२१ पासून पुढील ५ वर्षात गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षणावर भर दिला जाणार आहे. या योजनेची परिणीती निपुण भारत योजनेच्या उद्दिष्टपूर्तीमध्ये होईल यात शंका नाही.

नवीन शैक्षणिक धोरण समितीने निरीक्षणाने नमूद केलेली महत्वाची गोष्ट म्हणजे या दोन्ही अभियानाने शैक्षणिक गुणवत्ता वाढ व शिक्षणाचे सर्वत्रीकरण होत आहे परंतु त्याचबरोबर ठिकठिकाणी अशा अनेक शाळा सुसज्ज झाल्या ज्यामध्ये विदयार्थी संख्या कमी (३० पेक्षा कमी) आहे. या शाळासाठी भौतिक सुविधा करण्याची तसेच शिक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे. यातून एकल शिक्षक शाळा सुरु झाल्या. UDISE (Unified District Information System for education) या शैक्षणिक प्रणालीच्या आकडेवारीनुसार २०२१-२२ मध्ये शासकीय व अनुदानित ८२,४६० , खाजगी व विनानुदानित ३,३५,८४४ , तर शासकीय १,२२,३८६ शाळा आहेत. यातील १,१७,२८५ शाळा एकल शिक्षकी आहेत. या शाळा चालू ठेवणे जिकरीचे काम आहे. संसाधने पुरविणे आणि त्यांचा योग्य प्रमाणात वापर करणे अशक्य आहे. राजस्थान, आन्द्रप्रदेश या राज्यांनी चटया शाळांचे विलानीकरण वा एकत्रीकरण सुरु केले आहे. त्याचा चांगला परिणाम शिक्षण प्रक्रियेवर झालेला दिसून येत आहे. यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाने २०२५ पर्यंत सर्व छोट्या शाळांचे एकत्रीकरण करावे असे सुचविले आहे. यापूर्वी कोठारी आयोग (१९६४) मध्ये असे एकत्रीकरण सुचविले आहे. कोठारी आयोग अन्वये शाळा संकुलाचे मुख्य ध्येय संसाधनांचा योग्य प्रमाणात वापर, प्रभावी व्यवस्थापन, समन्वय, व उत्तम नेतृत्व संकुलातील सर्व शाळांना मिळावे हे होते. शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये हि शाळा संकुल संकल्पनेचा पुनरुल्लेख करून त्यासाठी शिफारस केली होती. शाळांची आर्थिक व भौतिक परिस्थिती ३४ वर्षात खूप बदलली आहे. त्यामुळे २०२० नवीन शैक्षणिक धोरणात या संकल्पनेचा अवलंब व्हावा एवढेच सुचविले नाही तर तो कशाप्रकारे करावा हेही नमूद केले आहे. 'या परिस्थितीवर राज्यशासन व केंद्रशासित प्रदेश शासनाकडून

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

२०२५ पर्यंत उपाय ठरवून त्याचा अवलंब करावा असे नवीन शैक्षणिक धोरणात सुचविले आहे. यासाठी शाळांचे एकत्रीकरण करून 'शाळा संकुल' योजना खालील दोन प्रकारे सुचविली आहे.

o दोन प्राथमिक शाळा व एक माध्यमिक शाळा यांचे संकुल

o काही शासकीय शाळा व काही खाजगी शाळा यांचे संकुल

संकुलातील शाळा भौतिक संसाधने, (क्रीडांगण इत्यादी) तसेच मनुष्यबळ ( शिक्षक, समुपदेशक), उपक्रम (प्रदर्शने इत्यादी) सामाईकरित्या वापरतील.' ( संदर्भ: नवीन शैक्षणिक धोरण २०२०)

या नव्या संकल्पनेने प्राथमिक व माध्यमिक शिक्षण क्षेत्रात अनेक बदल घडून येणार आहेत. तसेच संकल्पना यशस्वीपणे राबविण्यासाठी भौतिक संसाधनांचा वापर, आर्थिक बाबी व शिक्षकांची व्यवसाय वृद्धी यांचे योग्य नियोजन व विचार होणे अगत्याचे आहे. याप्रिक्रयेत शिक्षकांचे सहकार्य व सकारात्मक दृष्टीकोन, बदलाचा स्वीकार करण्याची मनोवृत्ती तपासणे आवश्यक आहे. सदर संशोधनातमक लेखात शिक्षकांच्या 'शाळा संकुल' या संकल्पनेबाबत मतांचा अभ्यास केला आहे.

**शीर्षक:**

"नवीन शैक्षणिक धोरण (२०२०) ने सुचविलेल्या 'शाळा संकुल' योजनेचा अवलंब याबाबत शालेय शिक्षकांच्या मतांचा अभ्यास"

**उद्दिष्ट्ये:**

१. नवीन शैक्षणिक धोरण (२०२०) ने (न.शै.धो.) सुचविलेल्या शाळासंकुल संकल्पनेचा लाभ व मर्यादा या दृष्टीने शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

२. न.शै.धो सुचविलेल्या शाळासंकुल संकल्पनेची आव्हाने व उपाय या दृष्टीने शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

३. शाळासंकुल योजना यशस्वी व्हावी यासाठी सूचना व शिफारस करणे.

**संशोधनाचे साधन**:

वरील उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना मराठी भाषेतील १८ वाक्य असलेली एक मतवाली देण्यात आली होती. प्रत्येक वाक्यास सहमत, असहमत, तटस्थ असे तीन पर्याय होते. यामध्ये काही वाक्ये हि पूर्वतयारी, आव्हान, परिणाम, सूचना दर्शवणारी आहेत.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

**सांख्यिकी:**

मतावालीतील प्रत्येक निवडलेल्या पर्यायांची टक्केवारी काढली. यापुढील अधिक सखोल अभ्यासासाठी न्यादार्षाच्या प्रकारानुसार गट करून ANOVA इत्यादी सांख्यिकी वापरता येईल. टक्केवारीमुळे शिक्षकांच्या मतांचा अभ्यास होण्यास मदत झाली.

**न्यादर्श:**

सदर विषय प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात असल्याने व महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती भारतीय भौगोलिक परीस्थितीशी साधर्म्य दाखवित असल्याने (दुर्गम, डोंगरी व समुद्रकिनारी असे तीनही भोगोलिक प्रकार महाराष्ट्रात आढळतात.) महाराष्ट्रातील विविध ठिकाणी राहणाऱ्या व शासकीय. विनानुदानित, खासगी, अनुदानित शाळेतील ३५ शिक्षकांना मतवाली वितरीत करण्यात आली. या शिक्षकाना NEP च्या संदर्भात सखोल ज्ञान आहे याची खात्री करून मतवाली दिली गेली. तयार केलेले साधन मराठी भाषेत होते. इतर राज्यांमध्ये वितरीत करताना हिंदी व त्या राज्याच्या भाषेत तयार करणे वेळेच्या मर्यादेमुळे शक्य झाले नसते.

**निरीक्षण व अर्थनिर्वचन:**

मिळालेल्या महितीनुसार सर्व म्हणजे १००% शिक्षक अनुदानित शाळेत शिकवितात.

७०% शिक्षक शासकीय , ३०% खाजगी शळेत शिकवितात. ९७% शिक्षकंची शाळा बहु शिक्षकी आहे तर ३.३३% शिक्षकांची शाळा एक शिक्षकी आहे.

- ४०% शिक्षक ग्रामपंचायत, १३.३३% महानगर व ५% खाजगी व्यवस्थापन मंडळात काम करतात.
- ७०% शिक्षक प्राथमिक तर ३०५ शिक्षक प्राथमिक व माध्यमिक विभागात काम करतात.
- ८०% शिक्षक सर्व शालेय विषय शिकवतात्त. ३०% शिक्षक निवडक विषय शिकवितात.
- १-५० पटसंख्या असलेल्या शाळा २३.३३% ५१-१०० पटसंख्या असलेल्या शाळा २०% १०१-१५० पटसंख्या असलेल्या शाळा १३.३३% त्यापेक्षा जास्त असलेल्या शालांचे प्रमाण त्याहून कमी आहे.
- पूर्व तयारी बद्दल मत- या योजनेसाठी प्रशासकीय स्तरावर रचना करण्याची गरज आहे असे मत ९९% शिक्षकांनी नोंदवले. ८३.३३% शिक्षकंच्या मते शैक्षणिक क्षेर्ताचे आर्थिक धोरण या योजनेसाठी बदलाने आवश्यक आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

लाभ याबद्दल मत- शाल संकुल हि संकल्पान अह्य्यान अह्यापण प्रक्रियेस उपयुक्त आहे या मताशी ७०% शिक्षक सहमत आहेत. २०% असह्मत आहेत. ७६.६६% शिक्षांच्या मते या संकल्पना राबविल्यामुळे एकशिक्षकी शाळेच्या समस्या सुटतील. ७३.३३५ शिक्षांच्या मते या मुळे व्यवसाय वृद्धीचे मार्ग शिक्षणा उपलब्ध होतील. ८७% शिक्षकांना भौतिक संसाधनाचा योग्य वापर होण्यासाठी हि संकल्पना योग्य वाटते. ६०% शिक्षकंच्या मते हि संकल्पना दिव्यांग विध्यार्थ्यांच्या शिक्षणास मदत करेल तर ३०% शिक्षक या मताशी सहमत नाही. या योजनेमुळे कला, क्रीडा शिक्षणास चालना मिलेले असे ७३% शिक्षकांचे मत आहे. व्यावसायिक शिक्षणास लागणारी संसाधने सामाईकरित्या वापरता येतील या विचारांशी ८३.३३% शिक्षक सहमत आहेत. ७६.६६% शिक्षकांच्या मते यामुळे मूल्यमापन पद्धतीत सुसूत्रता येईल.

मर्यादा याबद्दल मत- ८६.६६% शिक्षकांच्या मते हि संकल्पना दुर्गम भागात उपयुक्त नाही. ६०% शिक्षकाना यामुळे खाजगी शाळांचे वर्चस्व वाढेल असे वाटते. तर २६.६६% शिक्षक या मताशी असहमत आहेत. ७६.६६% शिक्षकांच्या मत आहे कि शाळा संकुल शैक्षणिक व्यवस्थापनास आह्व्हान निर्माण करेल. ६०% शिक्षक हि संकल्पना शिक्षकांमध्ये नकारात्मक स्पर्धा निर्माण करेल या विचाराशी सहमत नाही. ५६.६६% शिक्षक या योजनेमुळे खाजगी व शासकीय शाळांमधील गुणवत्तेतील फरक कमी होईल व माजी विध्यार्थ्यांचे सहकार्य शाळेच्या प्रगतीसाठी लाभेल असे मानतात. मात्र ३३.३३% शिक्षक या मताशी सहमत नाही. ७०% शिक्षकांच्या मते संकुल उपलब्धता व दर्जा याबाबत स्पर्धेचे ठिकाण होईल. म्हणजेच संकुलातील शाळेत स्पर्धा निर्माण होईल असे त्यांना वाटत्ते. २०% शिक्षक या मताबाद्द्ल तटस्थ राहिलेले दिसतात. याचप्रकारे संकुल योजतील प्रत्येक संकुल ‘समाज चेतना केद्र’ होईल या मतास ६६.६६% शिक्षक सहमती दर्शवतात. परंतु २३.३३% शिक्षक तटस्थ राहिले आहेत.

**निष्कर्ष:**

१-५० विध्यार्थी संख्या असलेल्या शासकीय व अनुदानित शाळा अधिक आहेत. या योजनेसाठी प्रशासकीय स्तरावर रचना करण्याची गरज आहे. शैक्षणिक क्षेत्राचे आर्थिक धोरण या योजनेसाठी बदलणे आवश्यक आहे. शाळा संकुल हि संकल्पना अध्ययन अध्यापन प्रक्रियेस उपयुक्त आहे. ही संकल्पना राबविल्यामुळे एकशिक्षकी शाळेच्या समस्या सुटतील. या योजनेमुळे व्यवसाय वृद्धीचे मार्ग शिक्षकाना उपलब्ध होतील. भौतिक संसाधनाचा योग्य वापर होण्यासाठी हि संकल्पना योग्य आहे. या

योजनेमुळे कला, क्रीडा शिक्षणास चालना मिळेल. व्यावसायिक शिक्षणास लागणारी संसाधने सामाईकरित्या वापरता येतील. या योजनेमुळे मूल्यमापन पद्धतीत सुसूत्रता येईल.

ही संकल्पना दुर्गम भागात उपयुक्त नाही. शाळा संकुल शैक्षणिक व्यवस्थापनास आव्हान निर्माण करेल, असे शिक्षकांना वाटते. शिक्षकांच्या मते संकुल उपलब्धता व दर्जा याबाबत स्पर्धेचे ठिकाण होईल.

या योजनेमुळे खाजगी शाळांचे वर्चस्व वाढेल, दिव्यांग विध्यार्थ्यांच्या शिक्षणास मदत करेल या बाबत शिक्षकांच्या मनात संभ्रम आहे. या योजनेमुळे खाजगी व शासकीय शाळांमधील गुणवत्तेतील फरक कमी होईल व माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य शाळेच्या प्रगतीसाठी लाभेल, संकुल योजनेतील प्रत्येक संकुल 'समाज चेतना केद्र' होईल या बाबत शिक्षकांच्या मनामध्ये स्पष्टता नाही.

**शिफारस**:

वरील अभ्यासावरून हे स्पष्ट होते कि शिक्षकांची बदलास तयारी आहे. काही गोष्टीमध्ये संभ्रम आहेत. राज्यसरकार कडून कार्यशाळा व उद्बोदन वर्ग घेतल्यावर हे संभ्रम दूर होतील. शाळांचे एकत्रीकरण करावे कि विलानीकरण करावे हे भौतिक परिस्थितीप्रमाणे ठरवावे. आर्थिक भर संकुल व शिक्षण क्षेत्रावर पडू नये यासाठी संकुलातील शाळांनी एकमेकांना मदत करावी. माजी विध्यर्थ्यांकडून विविध प्रकारचे सहाय्य घ्यावे. २०२५ पासून हि योजना कार्यरत होईल असे NEP मध्ये नमूद केले आहे, त्यामुळे कार्यशाळा व उद्बोदन वर्ग, चर्चा सत्रे यांना गती यावी.

शाळा संकुल हि संकल्पना शिक्षण क्षेत्रासाठी वरदान ठरेल. प्रदेशिक भाषेतून प्राथमिक शिक्षणाचा प्रसार यामुळे होईल हे निश्चित आहे. भारतीय संस्कृतीचे 'एकमेका साह्य करू' हे ब्रीद वाक्य यामुळे सफल होईल यात शंका नाही.

**संदर्भ:**

- https://www.mahayojanaa.in/2022/11/sarva-shiksha-abhiyan-ssa.htm
- file:///D:/Backup%2015082023/rajashree/NEP/NEP_Final_English_0.pdf
- https://www.mahayojanaa.in/2022/11/samagra-shiksha-abhiyan-in-marathi%20.html
- https://factly.in/data-there-are-1-17-lakh-single-teacher-schools-across-the-country-in-2021-22/

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

- https://www.yourarticlelibrary.com/schools/school-complex-needs-and-features/45254

*Cite This Article:*

**Dr. Joshi R.M.** (2024). *नवीन शैक्षणिक धोरणाने सुचविलेल्या 'शाळा संकुल' योजनेचा अवलंब याबाबत शालेय शिक्षकांच्या मतांचा अभ्यास.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number I, pp. 177–183).

**ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.10731805